Light of Life Trust

# प्रभाव दर्शक अहवाल

## २००५–२०२२

भारतीय ग्रामीण
समाज जीवनाचे उत्थान
**१४९८** गावे आणि
**३९८३२९** व्यक्ती लाभान्वित

ग्रामीण समाजातील वंचित व्यक्ती, विशेषतः बालके व महिला यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणे हे लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे ध्येय आहे.

लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट ही
अ-शासकीय संस्था २००२ साली
स्थापन झालेली एक असून,
बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ऍक्ट,
१९५० अंतर्गत नोंदणीकृत आहे.

२०२२

# अनुक्रमणिका


संस्थेबद्दल माहिती ३

प्रकल्पांची माहिती ६

लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे रोजगार प्राप्त लाभार्थी ७

**आनंदो प्रकल्प** ९
- आनंदो आणि आनंदो प्लस प्रकल्प
- अनंत प्रकल्प
- शाळा सक्षमीकरण प्रकल्प

**जागृती प्रकल्प** २३
- रोजगार प्रशिक्षण प्रकल्प
- आरोग्यसेवा– फिरता दवाखाना
- पर्यावरण संवर्धन

लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे कोविड काळातील मदतकार्य ३२

इतर शैक्षणिक संस्थातील विद्यार्थी सहभाग तथा कार्पोरेट सहाय्य ३३

दात्यांचे मनोगत ३४

लाईट ऑफ लाईफचे सहभागी ३६

# लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला मिळालेले पुरस्कार व मान्यता



**टाटा मुंबई मॅरथॉन २०१८ –**
५वी सर्वाधिक निधी उभा करणारी सामाजिक संस्था




**महाराष्ट्र सी एस आर पुरस्कार २०२२**
लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट – आनंदो प्रकल्प




**सिम्बॉयसिस स्कील अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी – पुणे**




**ग्रिहा पुरस्कार –२०१३**
अल्प उर्जा वापर




**ब्लू डार्ट**
**जागतिक सीएसआर दिवस**
**पुरस्कार –२०१६**




**सीएसआर लाईव्ह वीक**
इम्पॅक्ट कॉन्फरन्स पुरस्कार
– २०१९




**रिस्पॉन्सिबल बिझनेस अवॉर्ड्स**
मोस्ट रिस्पॉन्सिबल एनजीओ
– २०२२

क्रेडीबिलीटी अलायन्स
मान्यता प्राप्त

ACCREDITED FOR DESIRABLE NORMS
CREDIBILITY ALLIANCE
IMPROVING GOVERNANCE BUILDING TRUST

गाईड स्टार इंडिया
प्रमाणित

GuideStarIndia
PLATINUM
VALID TILL JUL 2023
AWARDED TO GSN 941
Light of Life Trust
www.guidestarindia.org.in
GuideStar India Certifications: Gold FY 2017 18 ; Platinum FY 2018 19, FY 2020 21
Subject to validity of registration under IT, FCRA and registration as NPO

टाटा सामाजिक विज्ञान संस्था
(TISS) सह एम्पॅनेलमेंट

भविष्य की पुनर्कल्पना RE-IMAGINING FUTURES
TISS
AESDII
Assessment and Empanelment Standards for Development Institutions in India

संस्थेचा परिचय

# निर्मिती व इतिहास

लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या संस्थापिका आणि व्यवस्थापकीय विश्वस्त, श्रीमती विली डॉक्टर आणि त्यांच्याप्रमाणे समान विचारसरणीच्या व्यक्तींनी एकत्र येऊन लाईट ऑफ लाईफ ट्रस्टची सुरुवात केली. एकेक व्यक्तीला सक्षम बनवत, ग्रामीण जीवनात परिवर्तन घडवून आणणे हे ध्येय होते तर पिढ्यानपिढ्या सुरू असलेली दारिद्र्याची साखळी तोडणे हे उद्दीष्ट होते.शिक्षण हाच दारिद्र्य दूर करण्याचा मार्ग आहे अशी धारणा होती.

महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील कर्जत येथील स्थानिक समाजीक गरजांचा अभ्यास केल्यानंतर, कोणतेही मूल शाळाबाह्य रहाता कामा नये या विश्वासाच्या आधारे, २००५ साली कर्जत तालुक्यात २५ मुलांसमवेत आनंदो प्रकल्प सुरू करण्यात आला.

जागृती प्रकल्पाच्या माध्यमातून, महिलांकरिता समुदाय केंद्र,जेष्ठांकरिता वृद्धाश्रम, मुलांसाठी बालगृह तसेच वैद्यकीय निदान केंद्र व आंगन प्रकल्पाच्या माध्यमातून दिव्यांग अतिथी केंद्र तसेच संशोधन व विकास केंद्र स्थापन करण्यावर संस्थापक सदस्यांनी आपले बळ एकवटले.

## ध्येय

"भारतातील वंचित ग्रामीण समाज-जीवनात परिवर्तन घडवून आणणे हे लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे ध्येय आहे."

## उद्दिष्ट

"एकेक व्यक्तीला सक्षम बनवून, पिढ्यांपासून चालत आलेली दारिद्र्य साखळी तोडणे."

### आनंदो प्रकल्प

२००५ साली सुरु झालेल्या या प्रकल्पांतर्गत, मुलांनी आत्मनिर्भर आणि सृजनशील नागरिक बनण्यासाठी, ३ई च्या समग्र दृष्टिकोनातून त्यांचा कौशल्य-विकास घडवून आणला जातो व शाळाबाह्य होण्याची शक्यता असलेल्या मुलांना शाळाबाह्य होण्यापासून परावृत्त केले जाते.
३ई चा समग्र दृष्टीकोन म्हणजेच :

- शिक्षित करणे (Educate)
- सक्षम करणे (Empower)
- रोजगारासाठी सुसज्ज करणे (Equip for Employability)

### जागृती प्रकल्प

२००९ साली सुरू झालेल्याजागृतीप्रकल्पाच्या तीन मुख्य कार्यक्रमांच्या माध्यमातून, वंचितग्रामीण समाजाचा सर्वांगीण विकास साधला जातो.

- कौशल्य आणि रोजगार प्रशिक्षण
- प्राथमिक आरोग्य सेवा (फिरते दवाखाने)
- पर्यावरण संवर्धन






TATA
GOLD LABEL
WORLD ATHLETICS








MUMBAI




I don't want to drop out
Empower
Back to School
DREAM

# लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट विश्वस्त मंडळ



## लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट संस्थापिका व व्यवस्थापकीय विश्वस्त

एक उत्कृष्ट शिक्षक, एक शिक्षणतज्ज्ञ, मानसशास्त्रज्ञ आणि थेरपिस्ट असणाऱ्या श्रीमती विली डॉक्टर या लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट आणि सत्यवती अध्यात्मिक फाउंडेशनच्या संस्थापिका आहेत. ऑरमैक्स' या सुप्रसिद्ध मार्केट रिसर्च कंपनीच्या त्या सह-संस्थापक आहेत. सेंट झेविअर्स कॉलेज येथे त्यांनी वरिष्ठ अधिव्याख्याता म्हणून कार्य केलेले असून निर्मला निकेतन, मुंबई, येथे त्या अथिती प्राध्यापक होत्या. त्यांनी मुंबईच्या सोफिया कॉलेजमध्ये मनोविज्ञान विभाग प्रमुख म्हणून एक दशकभर काम केले आहे.



श्रीमती गायत्री रुईया
– विश्वस्त



श्री जितेंद्र मेहता
– विश्वस्त



श्री मनोज मुरारका
– विश्वस्त



श्री पुनीत बी आनंद
– विश्वस्त



श्री अश्दिन डॉक्टर
– विश्वस्त

# लाइट ऑफ लाईफ ट्रस्ट वरिष्ठ व्यवस्थापकीय मंडळ



श्री प्रदीप कोपीकर,
मुख्य कार्यकारी अधिकारी (मानद),
लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट



श्री रमेश दासवानी, मुख्य
कार्यकारी अधिकारी,
लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट



श्री प्रदीप रॉय,
माननीय सल्लागार,
लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट



श्रीमती कमल दमानिया,
मुख्य कार्यवाही अधिकारी,
लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट

# लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे उपक्रम


**आनंदो प्रकल्प**
(शैक्षणिक)

१. आनंदो
   - १.१ विद्यार्थी मित्र पूरक शिक्षण प्रकल्प
   - १.२ अनंत कार्यक्रम

२. आनंदो प्लस
३. आनंदो शालेय सक्षमीकरण कार्यक्रम

**जागृती प्रकल्प**
(समुदाय विकास)


१. रोजगार व कौशल्य प्रशिक्षण
२. फिरते दवाखाने
३. पर्यावरण संवर्धन कार्यक्रम




## एकूण लाभार्थी संख्या (३९८३२९)

# रोजगार प्राप्त लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे लाभार्थी

## रोजगार प्राप्त आनंदो लाभार्थी





- खाजगी क्षेत्र – ९३८
- स्थलांतरित – ८८३
- कामगार – २५१
- मदतनीस – ९९
- कुशल कामगार – ६५
- स्वयंरोजगार – ६७
- व्यवसाय – ३८
- शासकीय कर्मचारी – ३८
- शिक्षक – १९
- नर्स – ११
- अभियंते – ११
- नेत्र चिकित्सक – ०६
- बीएमएस – ०३
- व्यावसायिक – ०२
- डॉक्टर – ०२
- आर्मी – ०२
- पोलीस – ०१
- शेती व्यवसाय – ०१

**१३०३०**

लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे लाभार्थी

## जागृती प्रकल्पाचे रोजगार प्राप्त लाभार्थी

- शिवणकाम – २४११
- संगणक – २०६२
- ब्युटीशियन – १४६७
- शेती व्यवसाय – १४१७
- ज्वेलरी मेकिंग – ३५६
- आरोग्य सेवक – १४०
- इंग्लिश स्पिकिंग – १०२
- पर्यावरण कार्यक्रम – १०३८
- शेतकीविषयक प्रशिक्षण – १२५२
- इतर – ३४८






# आनंदो प्रकल्प

आनंदो प्रकल्पाच्या माध्यमातून भारताच्या ग्रामीण समाजातील अनेक वंचित मुलांच्या माध्यमिक शिक्षणाला लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट प्रत्यक्षपणे मदत करते.

सन २००५ मध्ये आनंदो प्रकल्पांतर्गत आनंदो कार्यक्रम सुरू झाला. ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेतील वंचित मुलांना पाठबळ देऊन, त्यांना शाळाबाह्य न होऊ देता शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवले जाते. त्याचप्रमाणे त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहता यावे म्हणून व्यवसाय कौशल्य प्रशिक्षण देऊन सुसज्जतेच्या उद्देशाने काम केले जाते. या मुलांना केवळ शिक्षित करणे इतकाच माफक उद्देश नसून, ३ई पध्दतीच्या माध्यमातून प्रत्येक मुलाचा सर्वांगीण विकास साधला जातो. **३ई म्हणजेच शिक्षण देणे, सक्षम बनविणे आणि रोजगारासाठी सुसज्ज** करणे होय. अशा प्रकारे करियरसाठी योग्य मार्ग निवडून लाभार्थ्यांना जीवनाच्या बदलत्या परिस्थितीला स्वीकारण्यास सक्षम बनविले जाते.

## आनंदो कार्यक्रमात समाविष्ट केल्या जाणाऱ्या लाभार्थ्यांची वर्गवारी






आनंदो प्रकल्पात नोंदणी केलेले सर्व विद्यार्थी ग्रामीण कुटुंबातील आहेत ज्याची सरासरी कौटुंबिक उत्पन्न दरमहा रु. ४५००/– पेक्षा कमी आहे.

# शैक्षणिक परिणाम

## माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेलं विद्यार्थी




८८% विद्यार्थी दहावीची परीक्षा पास होऊन पुढील शिक्षणासाठी गेले. यांच्यापैकी :

७% विद्यार्थी दहावी परीक्षा अनुतीर्ण होऊन पुन्हा परीक्षेची तयारी करत आहेत.

५% विद्यार्थी दहावी परीक्षा अनुतीर्ण झाले परंतु पुन्हा परीक्षेला बसले नाहीत. या विद्यार्थ्यांपैकी :

- २८% मुली असून त्यांचे विवाह झालेले आहेत.
- ६% मुलगे असून ते त्यांच्या कौटुंबिक व्यवसायात आहेत.
- ६६% विद्यार्थ्यांनी व्यवसाय प्रशिक्षण पूर्ण केले आहे किंवा घेत आहेत

८८% विद्यार्थी दहावीची परीक्षा पास



१९% विद्यार्थी कनिष्ठ महाविद्यालयात शिकत आहेत

२३% विद्यार्थी दहावी परीक्षा पास होऊन कौशल्य प्रशिक्षण घेत आहेत

१५% विद्यार्थी पदवी परीक्षेचा अभ्यास करत आहेत

३% विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रम पूर्ण केला आहे

२% विद्यार्थी रोजगार प्रशिक्षण / तंत्र शिक्षण घेत आहेत


३% विद्यार्थी उच्च तांत्रिक शिक्षण / व्यवसाय प्रशिक्षण घेत आहेत

२२% विद्यार्थी बारावी परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत

१३% विद्यार्थी पदवीधर आणि पदव्युत्तर पदवी धारक आहेत

# रोजगार

लाभार्थ्यांनी निवडलेले वैविध्यपूर्ण करिअर पर्याय लाईट ऑफ लाईफ ट्रस्टची बहुसंख्य लाभार्थी मुले कनिष्ठ महाविद्यालय, पदवी, पदविका किंवा व्यावसायिक प्रशिक्षण घेतअसली तरीही यामुलांनी निवडलेल्या करिअर पर्यायांमधील विविधता त्यांच्या वर्गमित्रांनी निवडलेल्या करिअर पर्यायांच्या तुलनेत स्पष्टपणे उठून दिसते.






यशोगाथा व्हिडिओ
पाहण्यासाठी स्कॅन करा

**२४३७**

**आनंदो लाभार्थ्यांना रोजगार मिळाला आहे**

## आर्थिक प्रभाव

पालक - लाभार्थी तुलनात्मक उत्पन्न वितरण

- ९३% पालकांचे मासिक उत्पन्न रु.४,५००/- पेक्षा कमी आहे
- ६३% रोजगार प्राप्त लाभार्थ्यांचे मासिक उत्पन्न रु.५,५००/- ते रु.५०,०००/- च्या दरम्यान आहे
  - ४३% : रु.५,०००/- ते रु.७,०००/-
  - ४६% : रु.७,०००/- ते रु.१५,०००/- च्या दरम्यान
  - ९% : रु.१५,०००/- ते रु.२५,०००/- च्या दरम्यान
  - २% : रु.२५,००० ते रु.५०,०००/- च्या दरम्यान

## सामाजिक प्रभाव

- लाभार्थी मुलींच्या विवाहाचे वय :
- संस्था कार्यरत असलेल्या जिल्ह्यांमध्ये मुलींच्या विवाहाचे सरासरी वय १६ वर्षे आहे
- लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या लाभार्थी मुलींच्या लग्नाचे वय सरासरी २२ वर्षे आहे

- ५३१ विद्यार्थी कृतीदलात सहभागी असून, आपापल्या विभागातील सामाजिक समस्या सोडविण्यासाठी विविध उपक्रम राबवीत आहेत

## शैक्षणिक प्रभाव

ग्रामीण विभागातील मुली उच्च शिक्षण घेत आहेत

- लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या ३६०५हून अधिक लाभार्थी मुली आज घडीला उच्च शिक्षण घेत आहेत

- लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या हस्तक्षेपामुळे ६९२ आदिवासी मुले उच्च शिक्षण घेत आहेत

- लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या ५१% लाभार्थी मुली उच्च शिक्षण घेत आहेत, त्या तुलनेत महाराष्ट्र राज्याची टक्केवारी २७% आहे

# एका दृष्टिक्षेपात आनंदो प्रकल्प


## १७ वर्षात **१८१०७** लाभार्थी










- संस्थेच्या स्थापनेपासून आजवर १८१०७ लाभार्थी संख्या
- ५५.१% लाभार्थी मुली तर ४४.९% लाभार्थी मुलगे
- उच्च शिक्षण घेत असलेले लाभार्थी ११९७८
- महाराष्ट्र, मध्यप्रदेश, राजस्थान आणि ओडिशा या राज्यांत कार्यरत

# यशोगाथा



**अलीशाबा प्रकाश उजगरे, मानसशास्त्रातील पदव्युत्तर पदवीधर, खोपोली केंद्र, तालुका खालापूर, जिल्हा रायगड**

अलीशाबाने आपल्या मनाप्रमाणे शिक्षण घेता यावे म्हणून मार्गात आलेल्या सर्व आव्हानांवर मात केली आणि अनंत अडचणींना तोंड देत अखेर यशस्वी होऊन दाखविले. आई-वडील आणि पाच भावंडे असे अलीशाबाचे कुटुंब आहे. घरात तिचे वडील एकटेच कमावते असल्याने कुटुंबाच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांना मोठा संघर्ष करावा लागला. अलीशाबाची आई घरातील सर्व कामे सांभाळत असे. स्वत: शिक्षण घेऊन अलीशाबाने आपल्या दोन्ही धाकट्या भावांना शिकण्यासाठी प्रेरणा दिली. ८५% गुणांनी दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर अलीशाबाने ईलेक्ट्रीकल विषयातील डिप्लोमा करण्याचे ठरविले परंतु आर्थिक समस्येमुळे तिला हा कोर्स पूर्ण करता आला नाही. परंतु तिने खोपोलीच्या केएमसी कॉलेजमधून कला शाखेची पदवी मिळविली. यानंतर तिने पुण्याच्या एसएनडीटी महिला विश्वविद्यालयातून मानसशास्त्रातील पदव्युत्तर पदवी मिळविली. अलीशाबाच्या शैक्षणिक प्रवासात लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. ती लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करणाऱ्या पहिल्या फळीच्या विद्यार्थिनींपैकी एक आहे. सध्या ती लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट, कर्जत येथे संशोधन सहाय्यक म्हणून कार्यरत आहे. मानसशास्त्रात पीएचडी करण्यासाठी ती आता नेट-सेट परीक्षेची तयारी करत आहे. वैयक्तिक स्तरावर ती समस्याग्रस्त विद्यार्थ्यांसाठी समुपदेशनाचे कार्य करत आहे. या माध्यमातून अलीशाबा विद्यार्थ्यांना त्यांच्या अडचणी सोडवण्यास आणि आयुष्यात प्रगती करण्यास मदत करत आहे.



**राहुल बाळू काकडे, संगणक अभियंता पदवीधर, मोहिली केंद्र, तालुका कर्जत, जिल्हा रायगड.**

बालपणातच वडिलांचे छत्र हरपलेल्या राहुलचा सांभाळ त्याच्या आईने एकटीने केला. पोटापाण्यासाठी आईला रोजंदारीवर काम करावे लागत असल्याने राहुल अगदी विपरीत परिस्थितीत वाढला. कुटुंबातील इतर सदस्यांकडून फारशी मदत मिळत नसल्यामुळे स्वतःच्या आणि मुलांच्या उदरनिर्वाहासाठी राहुलच्या आईला रोजंदारी करणे क्रमप्राप्त होते. इयत्ता आठवीत असताना राहुलला आनंदो प्रकल्पात प्रवेश मिळाला आणि राहुलला शैक्षणिक प्रगती करण्यासाठी संस्थेकडून मार्गदर्शन व प्रेरणा मिळाली. मुळातच एक हुशार विद्यार्थी असल्याने राहुलने दहावीच्या परीक्षेत ८०% गुणांसह घवघवीत यश मिळविले आणि संगणक क्षेत्रात पदवी घेण्याचे ठरविले. कर्जत येथील यादवराव तासगावकर अभियांत्रिकी महाविद्यालयातून पदवी घेण्यासाठी राहुलला लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या माध्यमातून फीमध्ये सवलत मिळाली. सध्या राहुल म्हापे येथील माजेस्को कंपनी मध्ये जावा डेव्हलपर म्हणून काम करत असून त्याला महिना रु.२८,०००/- पगार आहे.

# यशोगाथा

**आकांक्षा हेमंत पाटील, इलेक्ट्रोनिक व टेलीकम्युनिकेशन्स पदवीधर अलिबाग केंद्र, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड.**



आपल्या स्वप्नांना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी आकांक्षाने खूप जिद्दीने आणि मेहनतीने प्रयत्न केले आहेत. ती कोळी समाजाची असून आपल्या चौकोनी कुटुंबासह अलिबागमध्ये रहात होती. तिने उच्च शिक्षण घेण्याबाबत तिच्या पालकांची काही हरकत नव्हती, परंतु घरातील सनातनी विचारसरणीमुळे तिला वर्गात कोणाशीही संवाद साधण्याची परवानगी नव्हती. यामुळे तिचा स्वभाव अगदी एकलकोंडा झाला होता. ती वर्गात कोणाशीही बोलत नसे. परंतु आता लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट मध्ये आल्यापासून तिच्या व्यक्तिमत्वाचा चांगला विकास झाला. तिच्यामध्ये अनेक बदल झाले. बारावीनंतरही तिचे शिक्षण सुरू राहावे म्हणून तिला संस्थेकडून खूप प्रोत्साहन मिळाले. परिणामी, इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशनमधील डिप्लोमा आकांक्षा पूर्ण करू शकली. डिप्लोमा मिळाल्यावर पनवेलमध्ये व्यवस्थापन प्रशिक्षणार्थी म्हणून ती काम करू लागली. सोबतच पदवी परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी तिने विश्वनिकेतन, खालापूर येथे प्रवेश मिळविला. शेवटच्या वर्षाच्या परीक्षेपूर्वीचतिला कॉलेज कॅम्पस प्लेसमेंट मधून रिलायन्स जिओ, घणसोली येथे, वर्षाला ३.६५ लाख रुपये पगारावर, अभियंता म्हणून नोकरी मिळाली.


**विनित गणेश पाटील, बीएससी, हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट, साळाव केंद्र, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड.**



२०१० साली विनीत, आनंदो कार्यक्रमाच्या अलिबाग तालुक्यातील साळाव केंद्रामध्ये दाखल झाला. त्याचे आई-वडील रोजंदारीवर काम करत होते. विनीतच्या घरची आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्याने रोजचा पोटापाण्याचा प्रश्न सोडविणे सुद्धा त्यांना अवघड जात असे. विनीतच्या घराच्या आजूबाजूला, समाजात शिक्षणाबद्दल अजिबातच जागरुकता नव्हती. त्याच्या आई-वडिलांनाही शिक्षणाबद्दल काहीच आस्था नव्हती. विनित अभ्यासात खूप मागे होता, पण तरीही लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या मदतीने तो दहावीला ४७% गुण मिळवून पास झाला. बारावीनंतर करिअर करता येईल अशा हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंटच्या कोर्सबद्दल त्याला लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट मधून माहिती मिळाली. अधिक चौकशी करण्यासाठी विनीत रत्नागिरीच्या दापोली येथील रामराजे विद्यालयात गेला आणि मग त्याने तिथेच प्रवेश घेतला. पदवी परीक्षेचा अभ्यास करता करता त्याने वेगवेगळी प्रदर्शने, प्रशिक्षणे वगैरेमध्ये सक्रिय सहभाग घेतला. सोबतच त्याने हॉटेल व्यवसाय करण्यासाठी आवश्यक कौशल्ये विकसित केली व वागण्या-बोलण्याचे शिष्टाचार समजून घेतले. हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट पूर्ण केल्यानंतर त्याला अबूधाबी येथे मुंबई चॅट रेस्टॉरंटमध्ये महिना रू.३२,०००/- मानधनाची नोकरी मिळवली आहे.

# अनंत कार्यक्रम

फ्लॉवरिंग ट्री इनकार्पोरेशन, अमेरिका आणि लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट यांनी २००८ साली संयुक्तपणे सुरू केलेला, ‘अनंत’ हा एक कलाशिक्षणविषयक अनोखा प्रकल्प आहे. या अंतर्गत, शेकडो मुलांना वाद्यसंगीत, हिंदुस्तानी कंठ संगीत, लोकसंगीत व सुगम संगीत तसेच नृत्यप्रशिक्षण दिले जाते. अनंतच्या माध्यमातून लाभार्थ्यांना सादरीकरणाच्या कौशल्यासह, सभाधीटपणाचा अनुभव विकसित करण्यासाठी संधी आणि व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते. संगीत व नृत्य विषयांतील निपूण शिक्षक व सामाजिक कार्यकर्ते मिळून अनंतची एक मजबूत टीम तयार झालेली आहे. अनंत कार्यक्रमाच्या या टीमच्या माध्यमातून लाभार्थ्यांना त्यांच्या आशा–आकांक्षांच्या आड येणाऱ्या आव्हानांवर मात करण्यासाठी मार्गदर्शन मिळते.



# कल्पतरू एक संगीतिका

'कल्पतरू एक संगीतिका' या कार्यक्रमाद्वारे अनंत लाभार्थ्यांना आपल्या कलागुण दर्शनासाठी एक व्यासपीठ मिळाले आहे. अनंतचे शिक्षक व संपूर्ण लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या टीमने या कार्यक्रमाचे संस्करण केलेले आहे. या अंतर्गत पहिला कार्यक्रम, २७ लाभार्थ्यांनी दिनांक २३ व २४ एप्रिल २०१६ या दिवशी मुंबई आणि पुणे येथे सादर केला. ०९ सप्टेंबर २०१७ रोजी मुंबईत याच कार्यक्रमाचा एक अतिरिक्त प्रयोग झाला.



# अनंतच्या यशोगाथा



**सोनाली वैते** – अत्यंत गोड गळ्याची परंतू घरातील दुर्लक्षित मुलगी, अलिबागची सोनाली हिने आनंदो प्रकल्पाच्या मदतीने दहावी व बारावी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. अभ्यासातही हुशार असल्यामुळे तिने आय.टी.आय.चा इलेक्ट्रीशियन कोर्स पूर्ण केला. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे भक्कम पाठबळ आणि अनंतचे मार्गदर्शन यामुळे तिने गंधर्व संगीत विद्यालयाच्या शास्त्रीय गायनाच्या दोन व सुगम संगीताच्या तीन परीक्षा उत्तीर्ण केल्या. नंतर ओ.एन.जी.सी. कंपनीत दरमहा रु.९,०००/– पगारावर नोकरी करून तिने कुटुंबाला आधार दिला. आता एम.एस.ई.बी.मध्ये ऑपरेटर म्हणून तिला दरमहा रु.१८,०००/– ची नोकरी मिळाली आहे. गायनाची खूप आवड असल्याने ती विविध संगीत कार्यक्रमांमध्ये गायन व अभिनय करते. २०२० मध्ये नारळी पौर्णिमेच्या निमित्ताने यू ट्यूबवर सोनालीने गायन व अभिनय केलेले एक गाणे प्रकाशित करण्यात आले ज्यामध्ये नारळी पौर्णिमेचे औचित्य साधून कोळी बांधव आपल्या होड्या समुद्रात घेऊन जातात व मच्छीमारी सुरु करतात असे चित्रण आहे.

# आनंदो शाळा सक्षमीकरण कार्यक्रम

शालेय गुणवत्ता विकास कार्यक्रम आनंदो प्रकल्पांतर्गत, शालेय गुणवत्ता विकास कार्यक्रम (SQDP) ची सुरुवात २०१२ साली झाली. विद्यार्थ्यांच्या जीवनातील सर्व संबंधित घटकांचा, त्यांच्या शालेय जडणघडणीत सहभाग असावा, जेणेकरून किमान मुलभूत शिक्षण मुलांनी खात्रीशीररित्या पूर्ण करावे या अनुषंगाने, शालेय वर्गांची संवादात्मक आंतर्क्रिया आणि पालक व स्थानिक व्यक्ती यांच्यासोबत शिक्षकांची प्रभावी सुसंवादाची कार्यपद्धती या विषयी शिक्षकांचे सक्षमीकरण करणे या उद्देशानेशालेय गुणवत्ता विकास कार्यक्रम (SQDP) सुरू करण्यात आला होता.

लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचा आघाडीचा कार्यक्रम आनंदो आणि शिक्षक केंद्रित शाळा सक्षमीकरण कार्यक्रम या दोन्हीमधील उपक्रमांचे एकत्रीकरण करून आनंदो शाळा सक्षमीकरण कार्यक्रम २०१९ साली सुरु करण्यात आला होता. आजपर्यंत या कार्यक्रमाच्या माध्यमातून ८४५ शिक्षक, ४२ शाळा आणि ३७७५५ माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यात संस्थेला यश मिळाले आहे.

## शिक्षक प्रशिक्षण

**८४५** | शिक्षक

**४२** | शाळा

नव्यासंकल्पना
- वर्ग प्रक्रियांमधील बदल
- शैक्षणिक साहित्य निर्मिती आणि त्याचा सुयोग्य वापर
- विद्यार्थ्यांचा सहभाग मिळविण्याच्या नाविन्यपूर्ण पद्धती
- सामाज कार्यातील पद्धतींचा अवलंब

## शालेय पायाभूत सुविधांची उभारणी

- संगणककक्ष
- विज्ञान प्रयोगशाळा
- सौरउर्जा जोडणी
- पुस्तकालय

## विद्यार्थी कृती दल

- १२,००० विद्यार्थी अप्रत्यक्षपणे लाभान्वित झाले आहेत

## पालक सहभाग

- ९५% शाळांमध्ये पालक बैठका घेतल्या जात नव्हत्या
- कार्यक्रम सुरु झाल्यापासून हळूहळू पालकांची उपस्थिती वाढल्याचे दिसून आले

## शिक्षण मोहोत्सव

शिक्षकांचा विकास आणि सहभाग वाढण्यासाठी बनविलेला वार्षिक कार्यक्रम स्वरूपातीलअनोख मंच
शिक्षण मोहोत्सव या कार्यक्रमाची वैशिष्ट्ये :
- सध्याच्या शिक्षण पद्धतीबद्दल शिक्षकांचे विचार, मते किंवा सूचना व्यक्त करण्यासाठी त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे
- शिक्षकांनात्यांचे कलागुण दाखविण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे


LIONS CLUB
Light of Life Trust
in partnership with
LARSEN & TOUBRO




of Life Trust
FOUNDATION








SHARE & CARE FOUNDATION
Light of Life Trust
Project Anando




TATA
TATA MUMBAI MARATHON 2020
TATA

रोजगार प्रशिक्षण



आरोग्य




पर्यावरण




Project Anando
ADITYA BIRLA CAPITAL

















Light of Life Trust
Project Anando
Centre - Mahan, Taluka - Barshitakli, Dist - Akola
Supported by
Perowshaw Dhunjishaw Bolton Charities



# जागृती प्रकल्प

युवती व महिलांसाठी रोजगार प्रशिक्षण आणि कौशल्य विकास, प्राथमिक आरोग्य सेवा आणि पर्यावरण संवर्धन या तीन महत्त्वपूर्ण कार्यक्रमांच्या माध्यमातून ग्रामीण विभागातील वंचित समुदायांची प्रगती, विकास आणि सक्षमीकरण हे २०१० साली सुरू झालेल्या जागृती प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे.

## रोजगार प्राप्त लाभार्थी संख्या (स्वयंरोजगार व नोकरी)






यशोगाथांचे व्हिडीओ पाहण्यासाठी या आकृतीला स्कॅन करा

# रोजगार प्रशिक्षण कार्यक्रम


जीवन आशा समुदाय केंद्रांचा विस्तार

**महाराष्ट्र :**

- कर्जत, जिल्हा रायगड येथील तिवरे, कडाव, कशेळे
- मुरबाड, जिल्हा ठाणे येथील धसई
- तळोदा, जिल्हा नंदुरबार येथील तळोदा
- मुंबई मधील कफ परेड
- अकोला जिल्ह्यातील शिवार

**राजस्थान**

- रामगढ, जिल्हा सिकर येथील रामगढ



# यशोगाथा

**श्रीमती अश्विनी राजेश ठाकरे, वय वर्षे ३४, उद्योजिका, धसई केंद्र, तालुका मुरबाड, जिल्हा ठाणे**



श्रीमती अश्विनी या ३४ वर्षीय विधवा महिला आहेत. आठवी आणि दहावीत शिकणाऱ्या दोन लहान मुलांची जबाबदारी इतक्या तरुण वयात त्यांच्या एकटीवर येऊन पडली. श्रीमती अश्विनी यांचे पती आजाराने निधन पावले. पती निधनानंतर त्यांच्या सासरच्या लोकांनी अश्विनी आणि मुलांची जबाबदारी घेण्यास स्पष्ट नकार दिल्यामुळे त्या आपल्या माहेरी आईकडे परत आल्या. परंतू अर्थार्जनाचा कोणताही मार्ग त्यांना दिसत नव्हता. अर्थप्राप्ती शिवाय लहान मुलांचे भवितव्य कसे घडवावे या चिंतेत त्या होत्या. त्यात भरीस भर म्हणून सासरच्या लोकांचा मानसिक आणि आर्थिक छळ सुरूच होता. अश्विनी समोर अत्यंत कठीण परिस्थिती होती. अल्पवयात लग्न केल्यामुळे त्यांचे शिक्षणही पूर्ण झाले नव्हते. अशातच अश्विनी यांना धसईच्या कौशल्य प्रशिक्षण केंद्राची माहिती मिळाली आणि त्यांनी ब्युटीशियन प्रशिक्षण कोर्ससाठी नाव नोदाविले. प्रशिक्षण पूर्ण होताच अश्विनी यांना कोर्सचे प्रमाणपत्र आणि एक स्टार्टर किट मिळाले. स्टार्टर किट असल्यामुळे अश्विनी यांनी घरातूनच पार्लर सुरु केले. स्वतःचे ब्युटीपार्लर सुरू करून मुलांना चांगले शिक्षण देण्याचा प्रयत्न केल्याबद्दल अश्विनी यांना स्वतःचा अभिमान वाटतो. याउपर अश्विनी यांनी कला शाखेच्या पदवी अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षाला प्रवेश घेऊन स्वतःचेही शिक्षण पुन्हा सुरु केले आहे. आजघडीला अश्विनी दरमहा रु.१०,०००/- इतकी अर्थप्राप्ती करतात आणि सगळ्या खर्चाचे सुयोग्य व्यवस्थापन करतात. आर्थिक स्वावलंबनामुळे अश्विनी यांचा आत्मविश्वास दुणावला आणि त्यांना आणखी धैर्य मिळाले आहे. स्थानिक बाजारपेठेत स्वतःचे पार्लर सुरू करण्याचे अश्विनी यांचे स्वप्न आहे.


**श्रीमती ज्योती ऐनकर, वय वर्षे ३८, उद्योजिका, कशेळे केंद्र, तालुका कर्जत, जिल्हा रायगड**



कशेळे गावापासून १२ किलोमीटर दूर खांडस या दुर्गम गावात श्रीमती ज्योती ऐनकर राहतात. या गावात बाजारपेठ नसल्याने उत्पन्नाची साधने अत्यल्प आहेत. लहान मोठ्या खरेदीसाठी इथले लोक कशेळे गावच्या स्थानिक बाजारातच जातात. श्रीमती ज्योती यांचे पती बांधकाम मजूर आहेत परंतु हे हंगामी स्वरूपाचे काम असल्याने त्याची काही शाश्वती नसते. नियमित उत्पन्न नसते. अशा परिस्थितीत आपणही घरखर्चाला थोडा हातभार लावावा असे श्रीमती ज्योती यांच्या मनात होते. म्हणून मग श्रीमती ज्योती यांनी कशेळे केंद्रात शिवणकाम कोर्स करण्याचे ठरविले. अनेक अडचणींवर मात करून, कोर्सला नियमितपणे उपस्थित राहून श्रीमती ज्योती यांनी शिवणकामाचे कौशल्य आत्मसात केले. कोर्स पूर्ण केल्यानंतर त्यांनी एक शिलाई मशीन विकत घेतले आणि घरातूनच शिवणकामाचा स्वतःचा व्यवसाय सुरू केला. नंतर त्यांनी शिवणक्लास सुरू केला. क्लासमध्ये ब्लाउज, गणवेश, मास्क वगैरे शिवायला शिकवले. कोविड काळात त्यांच्या सासऱ्याचा अपघात झाला. टाळेबंदीमुळे त्यांच्या पतीकडेही काम नव्हते. अशा परिस्थितीत श्रीमती ज्योती यांनी शिवणकाम करून कुटुंबाची आर्थिक गरज भागविली. रुग्णालयात उपचार घेत असलेल्या सासऱ्यांची काळजीही घेतली. आज श्रीमती ज्योती शिवणकाम करून महिना रु.८,०००/- ते १०,०००/- कमवू शकतात.

# फिरता दवाखाना (मोबाईल मेडिकल युनिट)

२०१२ सालापासून कार्यान्वित असलेल्या फिरत्या दवाखान्यांच्या माध्यमातून रायगड जिल्यातील कर्जत तालुका, ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुका, नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुका व पुणे जिल्ह्यातील आंबेगाव, जुन्नर व राजगुरुनगर या तालुका या सर्व ठिकाणच्या दुर्गम ग्रामीण भागातील आदिवासी वस्त्यांना, जेथे कोणत्याही प्रकारची वैद्यकीय सुविधा उपलब्ध नाही अशा ठिकाणी प्राथमिक आरोग्य सेवा पुरविली जाते.




**८३९१९**

रुग्ण व लाभार्थी एकूण संख्या






# वजनवृद्धी कार्यक्रम

६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये आढळणाऱ्या कमी वजनाच्या समस्येचे निराकरण करण्याच्या उद्देश्याने हा कार्यक्रम २०१८ साली सुरू करण्यात आला. ९ जिल्हा परिषद शाळा/आंगणवाड्यांमधील एकूण २७३ विद्यार्थी या कार्यक्रमांतर्गत समाविष्ट केले गेले.

२ अंगणवाड्या आणि ७ शाळांतील एकूण २७३ विद्यार्थ्यांनी वजनवृद्धी कार्यक्रमाचा लाभ घेतला

सहा महिन्यांच्या कालावधीत बहुतेक मुलांच्या वजनामध्ये २ ते ३ किलो इतकी लक्षणीय वजनवाढ दिसून आली.

पहिल्या वर्षी केलेल्या पायाभूत माहितीच्या तुलनेत, निवडलेल्या शाळांतील सर्व विद्यार्थ्यांच्या वजनवाढीचा वेग, वार्षिक मोजणीच्या वेळेस दुप्पट झालेला दिसून आला.

सर्व ९ शाळा/आंगणवाड्यांमध्ये नियंत्रण नमुन्यापेक्षा वजनवाढीचा वेग किमान अडीच पट होता.

सहा महिन्यांच्या कालावधीत अर्ध्याहून अधिक मुलांची उंची किमान २ सेंटीमीटरआणि ३०% मुलांची उंची ३ सेंटीमीटरपेक्षा जास्त वाढली.

आदिवासी वस्तीतील रायगड जिल्हा परिषद शाळा आणि आंगणवाडी नवसुचीवाडी येथील ६५% मुलांच्या उंचीत ३ सेंटीमीटर पेक्षा जास्त वाढ दिसून आली आहे. हे या कार्यक्रमाचे ठळक वैशिष्ट्य आहे.

# यशोगाथा



**काशीबाई यशवंत ठोंबरे, वय वर्षे ६०, मुंढेवाडी, कर्जत**

कर्जतपासून २० किलोमीटर दूर असलेल्या मुंढेवाडी येथे काशीबाई एकट्या राहतात. १९९८ साली त्यांच्या पतीचे निधन झाले आणि त्यांच्या मुलांनीही त्यांच्याशी बोलणे टाकले, तेव्हापासून त्यांच्यावर एकटे रहाण्याची पाळी आली. रु.३००/– रोजावर त्या आठवड्यातून दोन दिवस शेतमजुरी करून कसाबसा उदरनिर्वाह करतात. काही वर्षांपूर्वी काशीबाईंच्या डाव्या डोळ्याला दुखापत झाली होती पण त्यावर दुर्लक्ष करून विशेष उपचार न केल्याने हळूहळू त्या डोळ्याने दिसेनासे झाले. मुंढेवाडी येथील लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या फिरत्या दवाखान्याने आयोजित केलेल्या नेत्र तपासणी शिबिरात काशीबाई गेल्या असता, तेथे नायर सुपर स्पेशालिटी नेत्रतज्ज्ञांकडून त्यांची योग्य ती तपासणी करण्यात आली. मोतीबिंदूची शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला या शिबिरात हॉस्पिटलकडून त्यांना देण्यात आला आणि त्याचसोबत शस्त्रक्रियेपूर्वी आवश्यक रक्त तपासणी चाचण्या करण्याचा देखील सल्ला त्याना देण्यात आला. त्यानंतर काशीबाई यांची मोतीबिंदूची मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली आणि त्यांची हरवलेली दृष्टी त्याना परत मिळाली. आता काशीबाई सर्व कामे विनासायास करू शकतात आणि खूप आनंदात आहेत.



**कृपाली ज्ञानेश्वर मसाने, वय ८ वर्षे, आंबोट, तालुका कर्जत, जिल्हा रायगड**

छोटी कृपाली आंबोटच्या शाळेत दुसऱ्या इयत्तेत शिकते. शालेय विद्यार्थ्यांसाठी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने आयोजित केलेल्या आरोग्य तपासणी शिबिरात लक्षात आले की कृपालीची मान आणि खांदा दुखण्याची तक्रार आहे. तिला हा आजार लहानपणापासूनच असून तिच्या पालकांनी यावर कोणतेही वैद्यकीय उपाय केले नाहीत हे संस्थेच्या कर्मचाऱ्यांच्या लक्षात आले. कृपालीच्या जन्माच्या वेळेस तिच्या आईचे निधन झाले आणि तिच्या वडिलांनी दुसरे लग्न केले ही बाब अधिक चौकशीअंती समजली.वडील आणि सावत्र आईचे छोट्या कृपालीकडे दुर्लक्ष झाले आणि त्यांनी तिला एकटीलाच सोडले होते. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या कर्मचाऱ्यांना ही समस्या सोडविण्यासाठी कृपालीच्या वडिलांना विश्वासात घेणे गरजेचे होते. तिची मान–पाठ अशीच दुखत राहिली तर वाढत्या वयात तिला अजून त्रास होऊ शकतो हे तिच्या वडिलांना समजावून सांगितले. मग तिच्या वडिलांनी तिला संस्थेने सुचविलेल्या रुग्णालयात नेले आणि तिच्यावर यशस्वीरित्या शस्त्रक्रिया करण्यात आली. अशा रीतीने कृपालीचे दुखणे बंद झाले. आता कृपालीला कोणताही त्रास नाही आणि ती रोज उमेदीने शाळेत जाते.

# पर्यावरण संवर्धन कार्यक्रम

फळझाडांच्या रोपांचे वाटप व लागवडीवर देखरेख या माध्यमातून गरीब शेतकऱ्यांना उत्पन्नाचे अतिरिक्त साधन उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम सुरू करण्यात आला.

## कार्यक्रमाची ठळक वैशिष्ट्ये


- २१२८४५ अल्प भूधारक शेतकऱ्यांना फळझाडांच्या रोपांचे वाटप करण्यात आले
- १५० धूर विरहित चुलींचे वितरण
- ३७३२ पाणीगाड्यांचे वितरण
- कर्जतच्या तिवरे येथील जागृती जीवनआशा समुदाय केंद्रामध्ये सोलर ऑन-ग्रीड रूफटॉप सिस्टीम बसविण्यात आली.

हरित अक्षय ऊर्जा पर्यायाकडे वाटचाल म्हणून, आकेर पॉवरगॅस प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडून १० KW पॉवर ऑन-ग्रिड पीव्ही प्रणाली बसविण्यात आली. सदर प्रणाली आकेर पॉवरगॅस प्रायव्हेट लिमिटेड सी.एस.आर. च्या शाश्वत पर्यावरण कार्यक्रमाचा भाग म्हणून बसवली गेली

**२१२८४५** | रोपटे

**६२०८** | शेतकरी

## वार्षिक वितरण तक्ता



# यशोगाथा

**राजाराम कुशा पारधी, वय वर्षे ६५, वारा जांभुळवाडी, तालुका कर्जत, जिल्हा रायगड**



मेहनती आदिवासी शेतकरी राजाराम याला २०१६ साली ६५ फळझाडांची रोपे देण्यात आली. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या प्रशिक्षणांमध्ये दाखवलेल्या प्रत्येक कृषीतंत्रांचा वापर राजाराम यांनी रोपे लागवडीसाठी केला. अथक प्रयत्न करून अत्यंत काळजीपूर्वक रीतीने त्यांनी सर्व झाडे जगविली. झाडांना पाणी देण्यासाठी ते रोज दीड किलोमीटर अंतरावरून पाणी वाहून आणत असत. लागवड केलेल्या रोपांवर होणारा जनावरांचा हल्ला रोखण्यासाठी म्हणून शेतावर एक छोटीशी झोपडी बांधून राजाराम त्यात रहात असत. २०२१ साली त्यांच्या प्रयत्नांचे फळ म्हणून त्यांना ३५ ते ४० डझन आंब्याचे उत्पादन मिळाले. हे आंबे माथेरान आणि नेरळच्या बाजारात विकून त्यांनी रु.२५,०००/– कमावले. रासायनिक खतांचा वापर न करता केवळ नैसर्गिक खतांचा वापर करून सेंद्रिय पद्धतीने पिकविलेल्या उत्तम दर्जाच्या आंब्याला बाजारात जास्त मागणी होती. या पुढेही अजून मोठ्या प्रमाणावर उत्पादन करून विक्री करण्याची त्यांची इच्छा आहे. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या कर्मचाऱ्यांकडून प्रशिक्षण घेतल्याने राजाराम यांना विविध प्रकारे लागवड करता आली आणि त्यांचे कुटुंब अधिक समृद्ध झाले.

**यशवंत जानू भगत, वय वर्षे ५०, खांदण, तालुका कर्जत, जिल्हा रायगड**



५० वर्षांचे यशवंत खांदण गावातील प्रयोगशील शेतकरी असून त्यांना नव्या संकल्पना आत्मसात करण्याची आवड आहे. ऑल कार्गो लॉजिस्टिक लिमिटेड यांचे सहाय्याने सुरू असलेल्या पर्यावरण संवर्धन कार्यक्रमांतर्गत, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे लाभार्थी म्हणून २०१५ साली त्यांची निवड झाली आणि त्यांना ६३ फळझाडांची रोपे देण्यात आली. फळझाडांची लागवड करणे यशवंतसाठी नवीन होते. पाणी कमी असताना फळझाडे टिकवणे ही एक अडचण त्यांच्यासमोर होती. पण मग लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट टीमची मदत घेऊन त्यांनी शेततळे बांधण्यासाठी सरकारी योजनेचा लाभ घेतला. शेत तळ्यामुळे पावसाळ्यानंतरही बरेच दिवस झाडांसाठी पुरेसे पाणी उपलब्ध असणार होते. त्याच वर्षी यशवंत यांनी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या पहिल्या शेळीपालन वर्गासाठी नाव नोंदणी केली. कृषी प्रशिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी पाण्याचे व्यवस्थापन, रोपे भिजवणे, जमिनीचा कस वाढविण्यासाठी पालापाचोळा वापरणे, रोपांना आधार देणे, खतांचा वापर, छाटणी इत्यादी सर्व गोष्टी शिकून घेतल्या. मुबलक पाणी असल्यामुळे यशवंत आता भाजीपाला पिकवून बाजारात विकणे, रोपांची लागवड आणि सोबतच वीटभट्टीचा व्यवसायया सर्व गोष्टी करू शकले. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या सहाय्याने कृषिविषयक तंत्रे शिकून बऱ्यापैकी मासिक उत्पन्न मिळविणारे यशवंत हे एक प्रगतीशील शेतकरी आहेत.


allcargo




Karjat – Taluka






ENVIRONMENT
CONSERVATION














Project Jagruti







# लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे कोविड काळातील मदतकार्य २०१९-२०२०

कोविड काळातील देशव्यापी टाळेबंदीचा प्रत्येकावरच आर्थिक, शारीरिक आणि मानसिक परिणाम झाला. या कठीण काळातही लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट आपल्या सर्व कार्यक्षेत्रातील समुदायांपर्यंत पोहोचत होती आणि अवघड समस्या सोडवीण्यासाठी हर तऱ्हेने प्रयत्नशील होती.

कोविड काळात उद्भवलेल्या अवघड परिस्थितीला तोंड देण्याच्या दृष्टीने पहिल्या टाळेबंदी दरम्यान लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या सर्व आनंदो लाभार्थ्यांना महिन्याभरा पेक्षाही जास्त काळवाण सामानाच्या संचांचे वाटप करण्यात आले. एकूण ६४६० कुटुंबांना मदत करण्यात आली.

याशिवाय, वैद्यकीय मदत, आणीबाणीच्या परिस्थितीशी सामना कसा करावा यासंदर्भात मदत हवी असणाऱ्यांसाठी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या फिरत्या दवाखान्याच्या कर्मचाऱ्यांनी दुरध्वनी सेवा सुरू केली.

दुसऱ्या टाळेबंदीच्या वेळेस कोविडच्या आणखी एका लाटेच्या भयंकर परिणामांनी जेव्हा ग्रामीण जनजीवन त्रस्त झाले होते त्यावेळी संस्थेतर्फे ६७ गावे, आदिवासी वस्त्या येथील आनंदो केंद्रांवर जागरूकता आणि मदत कार्यक्रम राबविण्यात आला होता. याअंतर्गत एकूण २८२३ घरांतील १४००० हूनही अधिक व्यक्तींना मदत पुरविण्यात आली.

वाणसामानाचे संच (५ सदस्यांच्या कुटुंबासाठी महिनाभर पुरेल असे रेशनचे सामान), शिल्ड संच (एका घराला ३ महिन्यांहून जास्त दिवस पुरतील असे कापडी मास्क आणि सॅनिटायझरच्या बाटल्या), सॅनिटरी संच (घरातील महिलांसाठी सॅनिटरी नॅपकिन्स, आंघोळीचे, धुण्याचे साबण) यांचे वाटप या कार्यक्रमांतर्गत करण्यात आले. सोबतच गावातील जागरुक आरोग्य मित्र म्हणजेच वाड्या-वस्त्यांमध्ये मुलभूत आरोग्य चाचणी करण्यासाठी दिलेल्या उपकरणांचा वापर आणि जाणीव जागृती करणे यासाठी प्रशिक्षित असलेल्या गावातील व्यक्ती यांच्यासाठी आरोग्य रक्षक संच (ऑक्सीमीटर, थर्मामीटर, कापडाचे मास्क, हातमोजे आणि सॅनिटायझर्स) या संचांचे वाटप जागरुकता आणि मदत कार्यक्रमांतर्गत करण्यात आले.

कोविडची लागण झालेल्या रूग्णांना अत्यावश्यक सेवा उपलब्ध व्हाव्यात यासाठी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट फिरत्या दवाखान्यांच्या कर्मचाऱ्यांनी, रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सहकार्याने दुरध्वनी समुपदेशन सत्रे आयोजित केली होती. कोविड रुग्णांचे समुपदेशन करण्यासाठी केलेल्या अथक प्रयत्नांबद्दल लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला, १५ ऑगस्ट २०२१ रोजी, महाराष्ट्राच्या कॅबिनेट मंत्री, श्रीमती अदिती तटकरे आणि रायगडच्या जिल्हाधिकारी श्रीमती निधी चौधरी यांच्याकडून प्रशंसा पुरस्कार/प्रमाणपत्र मिळाले.













# इतर शैक्षणिक संस्थातील विद्यार्थी सहभाग तथा कार्पोरेट सहाय्य

| विद्यार्थी सहभाग | कार्पोरेट सहाय्य |
|---|---|
| अमेरिकन स्कूल ऑफ बॉम्बे | ऑलकार्गो लॉजिस्टिक लि. |
| किड्स फॉर किड्स – शेअर आणि केअर फाउंडेशन | भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड |
| एनएसएस हिल स्प्रिंग इंटरनॅशनल स्कूल | दिवान हाउसिंग फायनान्स लिमिटेड |
| सिम्बायोसिस इंटरनॅशनल स्कूल | गोदरेज अँड बॉइस मॅनुफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड |
| नरसी मोंजी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्सेस | जॉन्सन अँड जॉन्सन प्रायव्हेट लिमिटेड |
| युरो स्कूल, ठाणे | ऑरमॅक्स कन्सल्टन्टस प्रायव्हेट लिमिटेड |
| माउंट लिटेरा स्कूल इंटरनॅशनल | पिरामल एन्टरप्रायझेस लिमिटेड |
| द कॅथेड्रल आणि जॉन कॉनन स्कूल | रोचेस्टर इन्स्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी |
| युनिव्हर्सल बिझनेस स्कूल | रॅलीज इंडिया लिमिटेड |
| युनिव्हर्सिटी ऑफ पेट्रोलियम अँड ऊर्जा अभ्यास विद्यापीठ | टाटा कम्युनिकेशन्स लिमिटेड |
| आय टी एम बिझनेस स्कूल | ॲक्सिस बँक फौंडेशन |
| बीट्स स्कूल ऑफ मॅनेजमेंट | डी सी बी बँक लिमिटेड |
| | ग्लॅकसोस्मिथक्लाईन |
| | इन्फोसिस बी पी एम |
| | मॉर्गन स्टॅनली |
| | फिनिक्स मार्केट सिटी रिसोर्सेस प्रायव्हेट लिमिटेड |
| | पब्लीक्स सेपिअंट |

**१३३७** | विद्यार्थ्यांचा सहभाग

**१२** | शैक्षणिक संस्थांमधील

**१६५५** | कॉर्पोरेटस चा सहभाग

**१७** | कार्पोरेट कंपन्यांतून

# दात्यांचे मनोगत

कोविड महामारीमुळे लोकांच्या नोकऱ्या जात आहेत, आजूबाजूला निराशाजनक गोष्टी घडत आहेत, अशा परिस्थितीत लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे कर्मचारी सकारात्मकतेने काम करण्यात यशस्वी होत आहेत, आपल्या लाभार्थ्यांच्या भल्यासाठी निधी संकलनाचे नवीन मार्ग शोधत आहेत हे अत्यंत प्रशंसनीय आहे. विली डॉक्टर आणि लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या टीमला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.



**डॉ. विवेक मेंडोसा**

जानेवारी २०१९ मधील मुंबई भेटी दरम्यान आम्हाला लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या सदस्यांना भेटण्याची आणि या संस्थेच्या कार्याबद्दल, प्रकल्पांबद्दल अधिक जाणून घेण्याची संधी मिळाली. मिटिंग खूप चांगली झाली आणि आम्ही संस्थेचे काम पाहण्यासाठी जवळपासच्या एखाद्या केंद्राला भेट देण्याचे ठरवले. महाराष्ट्रातील कर्जत तालुक्यात संस्थेच्या केंद्रांना आम्ही भेट दिली. या भेटीत आम्हाला आनंदो केंद्र, जागृती केंद्र आणि संगणक प्रशिक्षण केंद्रातील मुले व शिक्षक यांच्याशी बोलता आले. या संवादामुळे आम्ही खूप प्रभावित झालो. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे कर्मचारी देखील अत्यंत माहितगार आणि सहकार्य करणारे होते. पहिल्या भेटीतच आम्हाला संस्थेचे प्रकल्प कसे चालतात याबद्दल चांगली माहिती मिळाली. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या कर्मचाऱ्यांनी त्यांचा वेळ दिल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्ह्यातील लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या आनंदो केंद्रांना मदत देण्याच्या आमच्या निर्णयामध्ये या संपूर्ण अनुभवाचे मोठे योगदान आहे.



**किशोर व**
**निमिता शहा**

शिक्षण आणि कौशल्य विकास या दोन गोष्टी स्वावलंबनाचा खरा आधार आहेत. आत्मनिर्भर होणं किती महत्त्वाचं आहे हे गेल्या काही वर्षांत आपल्याला शिकायला मिळालं आहे. तर प्रश्न असा आहे की, या दोन गोष्टी जास्तीत जास्त लोकांना मिळाव्यात म्हणून मी काय प्रयत्न करू शकतो. आणि नेमके हेच कार्य लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट करत आहे. त्यांच्या कार्यक्रमांच्या माध्यमातून लोकांना शिक्षण आणि कौशल्य विकास या दोन गोष्टी मिळत आहेत. आणि म्हणूनच मी त्यांना मदत करतो. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे कार्य उदात्त आहे. एका अत्यंत समर्पित टीमच्या मार्गदर्शनाखाली हे कार्यसुरू आहे. मी गेली ६ वर्षे लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट सोबत जोडला गेलो आहे आणि या उदात्त कार्याचा भाग असणं माझं भाग्यचआहे.




**हमेंत अहुजा**


मी लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट सोबत जवळून काम केले आहे आणि त्यांच्या अनेक प्रकल्पांसाठी मदत देखील केली आहे. खरोखर परिवर्तन घडवून आणणारी ही संस्था आहे. गरीब परिस्थितीमुळे आयुष्यात विकासावर मर्यादा पडलेल्या अनेक गुणी निराधार मुलांना पुढे आणण्यासाठी संस्था सचोटीने आणि प्रामाणिकपणाने कार्य करते. आकाशात उंच उडण्यासाठी या मुलांच्या पंखांना बळ देण्याचे कार्य लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट यांनी केले आहे. डॉ. विली डॉक्टर यांच्या प्रेमळ आणि दयाद्र मार्गदर्शनाखाली, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट टीमचे काम आध्यात्मिक उत्साहात चालते. मला त्यांच्या कार्याचे मनापासून कौतुक वाटते. त्यांच्या ध्येयपूर्तीसाठी माझ्या हार्दिक शुभेच्छा आहेत.



**रवि शिवदासानी**

# आणखी काही जिल्ह्यांमध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी आमच्या आगामी प्रकल्पांत आम्हाला मदत करा.





# लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे भागीदार

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Aakar Charitable Trust | Bettering Lives, Together ADITYA BIRLA CAPITAL | aKaR pRaKaR | ADVANZ PHARMA | AkerSolutions |
| allcargo logistics ltd. Ingenuity In Motion | ameya LOGISTICS | annam | APOLLO progressive.adaptive.innovative | Antelec Ltd. |
| arcadia shipping limited | ASAP FLUIDS Adapt Solutions, Adopt Practicality | Asian Star Perfection from within | atDta | ate CHANDRA FOUNDATION |
| Avendus | AXIS BANK FOUNDATION | FINSERV ACTIVATE | B&K SECURITIES WE UNDERSTAND MONEY | BAYER Bayer |
| BHARAT EDTECH INITIATIVE | Bharat Petroleum energising lives | CHANCE AUF LEBEN e.V | CHILDREN'S HOPE INDIA EVERY CHILD COUNTS | CONCERN INDIA FOUNDATION HELPING PEOPLE HELP THEMSELVES |
| C\|T GROUP CROSBY TEXTOR INDIA PRIVATE LIMITED | DHFL Changing Rules Changing Lives | DMI MANAGEMENT | D-Link Building Networks for People | Dr. Pallavi Shah |
| E-CITY Ventures | EdelGive Foundation An Edelweiss Initiative | ESTATE OF LATE FRENY PAREKH | ERASE POVERTY (HONG KONG) | HORMIS MEMORIAL FOUNDATION FEDERAL BANK A Federal Bank CSR Initiative |
| firstsource | FLOWERING TREE | give INDIA | GAIL (India) Limited | Gits |
| Godrej PROPERTIES | GRUH FINANCE LIMITED We help you build homes | gumpro DRILLING FLUIDS | HAMENT AHUJA | The Lakshmi Mittal and Family SOUTH ASIA INSTITUTE HARVARD UNIVERSITY |
| HBS REALTORS | HDFC BANK We understand your world | HDFC WITH YOU, RIGHT THROUGH | HDFC CREDILA The Education Loan Specialist | HDFC BANK PARIVARTAN A step towards progress |
| HIGH STREET PHOENIX | Höganäs | hp | IDBI BANK | IGATE |
| IL&FS | IndusInd Bank | ION FOUNDATION Initiate • Organise • Nurture | Unique J. B. CHEMICALS & PHARMACEUTICALS LIMITED | JEWELEX FOUNDATION |

# लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे भागीदार

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Johnson & Johnson PRIVATE LIMITED | Kishore Shah & Nimita Shah | kotak Education Foundation | LARSEN & TOUBRO | LIC भारतीय जीवन बीमा निगम LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA LIC GOLDEN JUBILEE FOUNDATION |
| LIONS INTERNATIONAL | LIONS QUEST A Program of Lions Clubs International Foundation | | LOTUS CHARITY | Madhur Gupta |
| MF Maharashtra Foundation | Mastek Trust. Value. Velocity | MEHTA CHARITABLE TRUST | MOTILAL OSWAL | Chhatrapati Shivaji INTERNATIONAL AIRPORT MUMBAI |
| | NIHCHAL ISRANI FOUNDATION | NRB BEARINGS | NSS HILL SPRING INTERNATIONAL SCHOOL | Narotam Sekhsaria Foundation |
| NAVNEET FOUNDATION FOR IT IS IN GIVING THAT WE RECEIVE | NTAsset | omkar FOUNDATION | PEROWSHAW DHUNJISHAW BOLTON CHARITIES | Prabhudas Lilladher POWERING YOUR FINANCIAL GROWTH |
| PRECISION | PREMIUM | PRIX Italia | RALLIS INDIA LIMITED A TATA Enterprise | rivera stiftung A GERMAN CHARITY TRUST |
| Renaissance Global Limited | RIVERGATE RESORT | ROSY BLUE MORE THAN DIAMONDS | Rotary eClub One | ROTARY CLUB OF BOMBAY CENTRAL |
| ROTARY CLUB OF BOMBAY HANGING GARDEN | ROTARY CLUB OF BOMBAY WORLI | SAFFRON energising ideas | Sar-La EDUCATION TRUST WORLD OF EDUCATION | SBI FOUNDATION Service Beyond Banking |
| SBI Life Apne liye. Apno ke liye. | SBI MUTUAL FUND A PARTNER FOR LIFE | SOPAN | selvel Publicity & Consultants pvt. ltd. | SERUM INSTITUTE OF INDIA PVT. LTD. Cyrus Poonawalla Group |
| SHARE & CARE FOUNDATION | Shriyans Prasad Charitable Trust | STERLING & WILSON | StockHolding We look after everything | STONE SHIPPERS LTD. |
| SUBURBAN DIAGNOSTICS PRECISE TESTING · HEALTHIER LIVING | TATA TRUSTS | | The Zoroastrian Co-operative Bank Ltd. | TRIO |
| Union Bank Social Foundation | VIBHUM CHARITABLE TRUST | vodafone | VOLTAS | WELSPUN INDIA HOME TEXTILES |

# संपर्कासाठी


**नोंदणीकृत कार्यालय:**
१८१, डिजिटल प्लॅनेट, हिल रोड, वांद्रे पोलिस स्टेशनच्या पुढे,
वांद्रे (पश्चिम), मुंबई – ४०००५०.

**मुख्य कार्यालय:**
वन बीकेसी, सी – विंग, युनिट क्रमांक १५१९,
प्लॉट क्रमांक सी – ६६, जी–ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स,
वांद्रे (पूर्व) मुंबई – ४०० ०५१
• दूरध्वनी: + ९१–२२–६९०४७४७० • ईमेल: connect@lightoflifetrust.org


**शाखा कार्यालये:**

| | |
|---|---|
| **महाराष्ट्र** | • अहमदनगर • अकोला • अलिबाग • जालना • कर्जत • माणगाव • मुंबई • मुरबाड • नंदुरबार • वाशिम • यवतमाळ |
| **मध्य प्रदेश** | • सिवनी |
| **ओडिशा** | • अंगुल |
| **राजस्थान** | • बिजोलिया • सिकर |

LightOfLifeTrustIndia
@lightoflifetrst
@lightoflifetrust_lolt
youtube.com/c/lightoflifetrust
lightoflifetrust
www.lightoflifetrust.org